## नियमित दिवाणी दावा क्र.१४८/२०२० मधील निशाणी क्र.७१ खाली आदेश

## (पारित दिनांक ०८ सप्टेंबर, २०२५)

प्रस्तुतचा अर्ज वादीने मयत प्रतिवादी क्र.१ अहमद रमजान आत्तार यांचेविरुध्द् झालेला अबेटमेंट सेट असाईडचा हुकूम रद्द होण्याकरीता दाखल केला आहे. वादीचे म्हणणेनुसार प्रतिवादी क्र.१ यांचा दि.०८/१०/२०२४ रोजी, मु.पो. कानगाव, ता. दौंड, जि. पुणे येथे मृत्यु झाला आहे. सदर प्रतिवादी मयत झाल्याची कल्पना वादीना नव्हती व प्रतिवादींनीही मयताची माहिती दिली नाही. तसेच प्रतिवादी क्र.१ यांचे मृत्यु प्रमाणपत्र काढण्याकरीता कारवाई केली असता वादीला दि.२८/०२/२०२५ रोजी मयताचा दाखला मिळाला. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र.१ यांचे वारसांना मुदतीत अभीलेखावर घेता आले नसल्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांचेविरुध्द् पारीत झालेला अबेटमेंट सेट असाईडचा आदेश रद्द करण्याची विंनती केली.

२. सदर अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले असता प्रतिवादी क्र.२ यांनी त्यांचे म्हणणे निशाणी ७९ वर दाखल केले. प्रतिवादींचे म्हणणेनुसार सदरचा वादीचा अर्ज खरा, बरोबर, प्रामाणिकपणाचा कायदेशिर नसल्याने सदरचा अर्ज त्यांना मान्य व कबुल नाही. तसेच अर्जातील नमुद कारणे खरी नाहीत व अर्ज मेंटेनेबल नाही. सदर दाव्याचे कामकाज लांबवण्यासाठी वारस रेकॉर्डवर घेण्यास विलंब केल्याचे नमुद केले. त्यामुळे सदरचा अर्ज तीन हजार रुपयाचा खर्च लावुन नामंजुर करण्याची विनंती केली.

३. अर्ज, म्हणणे वाचले. दोन्ही वकीलांचे म्हणणे ऐकले व कागदपत्रांचे अवलोकन केले. सदरचा दावा जाहीर ठराव व निरंतर मनाईकरीता दाखल केला आहे. सदर वादीने यादी निशाणी ७६ वर दाखल मयत प्रतिवादी क्र.१ अहमद रमजान आत्तार यांचा दि.०८/१०/२०२४ रोजी मृत्यु झाल्याचे मृत्युपत्रावरुन दिसुन येते. सदर प्रकरणात प्रतिवादी क्र.१ यांचे वारसांचा सदर प्रकरणातील अचल संपत्तीमध्ये हिस्सा असल्याने त्यांचे हक्क व अधिकारावर सदर दाव्याच्या

न्यायनिर्णयाचा परिणाम होणार आहे. सदरचा अर्ज हा वादीने मयत प्रतिवादी क्र.१ हे मरण पावल्यापासुन ९० दिवसांच्या आत दाखल केला नाही. वादीने केवळ प्रतिवादी क्र.१ मयत झाल्याबाबतची माहिती दिली नसल्याने विलंब झाल्याचे नमुद केले. सदर प्रकरणाचे स्वरुप विचारात घेता सदर प्रतिवादी क्र.१ चे वारसांना दाव्यात समाविष्ट करणे गरजेचे आहे. सदर प्रतिवादी क्र.१ मरण पावल्यानंतर ९० दिवसाच्या आत अर्ज करणे गरजेचे होते. त्यामुळे प्रथमदर्शनी वादीने सदरचा अर्ज उशीराने केल्याचे बाब अर्जाचे तारखेवरुनच दिसुन येते. सदर विलंब किती झाला याबाबत स्पष्टपणे नमुद करणे आवश्यक नाही. केवळ न्यायालयाने विलंबाचे कारण व दाव्याचे स्वरुप पाहणे गरजेचे आहे. माझ्या मते सदर वादीने प्रतिवादी क्र.१ यांचेविरुध्द् झालेला अबेटमेंट सेट असाईडच्या अर्जात दिलेली कारणे ही संयुक्तिक आहेत. प्रकरणातील दाव्याचे स्वरुप हे अचल संपत्तीच्या संबंधाने असुन प्रकरणातील होणा–या अंतिम न्यायनिर्णयामुळे सदर अर्जदारांचे हक्क व अधिकारावर परिणाम होणार आहे. करीता, मी खालील आदेश परीत करतो –

## आदेश

१. वादीचा निशाणी ७१ वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ यांचेविरुध्द पारीत झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

SHAILENDRA NANDKISHOR PATIL

Digitally signed by SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Date: 2025.09.09 15:09:07 +0530

ठिकाणः दौंड,
दिनांक ०८/०९/२०२५

**(एस.एन. पाटील)**
२रे सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
दौंड, जि. पुणे

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ न्यायनिर्णय फाईलमधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :: | एम.एम. चिंतले |
| न्यायालयाचे नांव | :: | एस.एन. पाटील<br>२रे सह दिवाणी न्यायाधीश, दौंड<br>ता. दौंड, जि.पुणे |
| निकाल दिनांक | :: | ०८/०९/२०२५ |
| पिठासीन अधिका–याने निकालपत्रावर सही केलेचा दिनांक | :: | ०८/०९/२०२५ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | :: | ०९/०९/२०२५ |